TIME : 2 Hrs Creative Writing MARKS : 60

सूचना : सर्व प्रश्न आवश्यक.

प्र.१ पुढे दिलेले कथासूत्र वापरुन कथेच्या घटकांच्या आधारे स्वरचित कथा लिहा. (१५)

"दुरुन डोंगरे साजरे"

किंवा

प्र.१ पुढे दिलेली कथा वाचून कथेच्या विविध घटकांच्या आधारे सविस्तर विश्लेषण करा. (१५)

एकदा सूर्य व वारा यांच्यात भांडण झाले. वारा म्हणाला, "साऱ्या जगात मी श्रेष्ठ आहे." सूर्य म्हणाला, "मी तुझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे." कोणीच आपली हार मानायला तयार नव्हते. तेवढ्यात रस्त्याने जाणारा एक माणूस सूर्याला दिसला. सूर्य वाऱ्याला म्हणाला,"हे वाऱ्या, तुझ्या शक्तीचा तुला गर्व वाटतो ना? मग आपण पैज लावू या. रस्त्याने जाणाऱ्या या माणसाच्या अंगावरचा कोट काढून दाखव." वाऱ्याने ही पैज मान्य केली.

"हे काम एकदम सोपे आहे", असे म्हणून वारा सोसाट्याने वाहू लागला. तेव्हा माणसाने आपला कोट अंगाशी घट्ट धरुन ठेवला. शेवटी वारा दमला. पण त्याला काही माणसाच्या अंगावरचा कोट काढता आला नाही.

सूर्य म्हणाला, "हे वाऱ्या, बघ आता, मी काय करतो ते." सूर्य भरभर तापू लागला. हवेतील उष्मा सहन झाला नाही. त्याने त्याच्या अंगावरचा कोट काढला. अशा प्रकारे सूर्याने पैज जिंकून वाऱ्याचे गर्वहरण केले.

प्र.२ अ. पुढे दिलेल्या विषयावर स्वरचित कविता लिहा. (५)

'पाऊस' किंवा 'गाव'

ब. पुढील कविता वाचून त्यातील सूत्र भाषाशैली, अलंकार, प्रतिकारात्मक इ. काव्य घटकांच्या आधारे तिचे विश्लेषण करा. (१०)

उदासवाण्या सागरतीरी, संथ वाहती लाटा
दूर निळ्या क्षितिजाच्या काठी, धूसर झाल्या वाटा

तांडाच्या झावळ्या, मंद मंद डोलती
आभाळाच्या कुशी विहरतो, पक्षी कुणी एकटा

शुभ्र शिडांच्या अनेक नौका, दूर कुठे चालल्या
शोध कुणाचा घेण्या जाती, मावळतीला आता

अशा अवेळी कातरवेळी, कोण भैरवी गाई
सूर कुणाचा, गीत कुणाचे व्यथा कुणाच्या चित्ता

प्र.३ प्रश्न क्रमांक १ मध्ये दिलेल्या कथेचे पटकथेत रुपांतर करा. (१५)

किंवा

प्र.३ तुम्ही अलिकडे पाहिलेल्या मराठी चित्रपटाचे सविस्तर परीक्षण करा. (१५)

प्र.४ टिपा लिहा. (कोणत्याही तीन) (१५)

१. नाटकातील भाषेचे वेगळेपण
२. बौद्धिक स्वामित्व हक्क
३. ब्लॉग
४. इंटरनेटवरील बातम्या
५. कवितेतील आलंकारिकता